अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांचे वेतन अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- न्यायाप्र २०२६/ प्र. क्र. १६२ (ई-१६६३९८९)/ एसडी-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र.६०१/ २०२६/ सीपी २४४५४ (२४) (स्टॅम्प)/ वेतन/ १८६२८३, दि. २४.०४.२०२६.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र. ६०१/ २०२६/ सीपी ७०९ (२५)/ वेतन/ १८६१७११, दि. २४.०४.२०२६.
३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र.६०१/ २०२६/ सीपी ५०९ (२४)/ सीपी ५१२ (२४)/ वेतन/ १८५९९१६, दि. २३.०४.२०२६.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र.६०१/ २०२६/ रिट ३६९६/ मागणी/ १८५९९२५, दि. २३.०४.२०२६.
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र. ६०१/ २०२६/ अया ५६८/ मागणी/ १८६१६५१, दि. २३.०४.२०२६.
६) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६.
७) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.
८) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण २०२४/ प्र. क्र. ७४७/ टीएनटी-१, दि.०८.१०.२०२४.

प्रस्तावना :-

अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे अवमान याचिका ५६८/२०१७, अवमान याचिका ५०९/२०२४ व अवमान याचिका ५१२/२०२४ आणि अवमान याचिका ७०९/२०२५ तसेच, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे अवमान याचिका २६४/२०२२ व इतर याचिका व अवमान याचिका (स्टँप) २४४५४/२०२४ दाखल केलेल्या आहेत. सदर याचिकांमधील विशेष शिक्षकांना वेतनाची रक्कम अदा करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र. १ ते ५ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेले आहेत.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी संदर्भ क्र. ४, दि. २३.०४.२०२६ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावातील १०४ पात्र विशेष शिक्षकांपैकी केंद्रस्तरावर रूजू होऊन नियमित वेतन सुरू झालेल्या ८६ विशेष शिक्षकांच्या सहा महिन्यांच्या वेतनाकरिता आवश्यक असणारा रु. ३,८७,००,०००/- इतका निधी वगळून उर्वरित पात्र व अपात्र विशेष शिक्षकांच्या वेतनाकरिता आवश्यक असलेला निधी तसेच, संदर्भ क्र. १ ते ३ व ५ अन्वये केलेल्या विनंतीनुसार एकूण रु. २९,९६,७२,४८९/- इतका निधी (२२०२ आय ६१२), ३१-सहायक अनुदाने या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत निधीतून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे अवमान याचिका क्र. ५६८/२०१७, अवमान याचिका ५०९/२०२४ व अवमान याचिका क्र. ५१२/२०२४ आणि अवमान याचिका क्र. ७०९/२०२५ तसेच, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे अवमान याचिका क्र. २६४/२०२२ व इतर याचिका व अवमान याचिका (स्टँप) २४४५४/२०२४ मधील विशेष शिक्षकांच्या वेतनाकरिता रु. २९,९६,७२,४८९/- इतका निधी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र. ४ येथील पात्र १०४ पैकी केंद्रस्तरावर रूजू होऊन नियमित वेतन सुरू झालेल्या ८६ विशेष शिक्षकांच्या सहा महिन्यांच्या वेतनाकरिता आवश्यक असणारा निधी वगळून तसेच, संदर्भ क्र. १ ते ३ व ५ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावातील नमूद विशेष शिक्षकांची संख्या तसेच, त्यानुषंगाने मागणी केलेल्या निधीची परिगणना अचूक असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांची राहील.

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या प्रस्तुत प्रस्तावात नमूद विशेष शिक्षकांची संख्या ही, विशेष शिक्षकांना विभागीय अध्यक्ष बोर्ड आणि शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या स्तरावर दिलेल्या सुनावणीच्या संधीत पात्र/ अपात्र शिक्षकांच्या संख्येच्या मर्यादेत असल्याचे प्रमाणित करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांची राहील.

४. अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांनी मा. न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकांमध्ये, मा. न्यायालयाने दिलेल्या अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करतांना, याचिकाकर्त्या विशेष शिक्षकांच्या सेवा समाप्ती/ सेवा समायोजनाबाबत दिलेल्या आदेशातील मुद्यांची खातरजमा करुन कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांची राहील.

५. विशेष शिक्षकांना अदा करावयाच्या वेतनाची रक्कम मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार जमा करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. विशेष शिक्षकांच्या वेतनासाठी आवश्यक असणाऱ्या रकमेची अनुज्ञेयता व परिगणना शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तपासणीच्या अधीन राहून निधी वितरणास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत अनियमितता अथवा दिरंगाई होणार नाही, याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

६. उपरोक्तनुसार वेतन / मानधन अदा केल्यानंतर निधी शिल्लक राहिल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. शिल्लक निधीचा विनियोग करण्यापूर्वी शासनाची पूर्वमान्यता घेण्यात यावी. वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र एक महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करावे.

७. सदर खर्च "मागणी क्र. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६-शिक्षक व इतर सेवा, (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२ आय ६१२) (कार्यक्रम), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

८. सदर निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधी सायबर कोषागार कार्यालयामार्फत (कोषागार संकेतांक-८१०१) आहरित करण्यासाठी

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. समग्र २०२५/ प्र. क्र. १४५/एसडी-१ दि.०९.०९.२०२५ व शासन निर्णय, क्र. संकीर्ण २४२५/ प्र. क्र. ६५/ अर्थसंकल्प (ई-१३४७२००), दि. १९.०९.२०२५ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच देयके आहरण व संवितरण करण्याकरिता उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना “आहरण व संवितरण अधिकारी” घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार वितरित करण्यात आलेला निधी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सुपूर्द करावा.

९. प्रस्तावित निधी वितरित करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

१०. वित्त विभाग, शासन परिपत्रक दि. ०७.०४.२०२६ व दि. ०९.०५.२०२५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता होत आहे. सदरचे अनुदान सशर्त अनुदान असून त्याकरिताच्या अटी व शर्ती या शासन निर्णयात नमूद केल्या आहेत.

११. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ४३०/व्यय-५, दि. २१.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१८२८३१५४४९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA
AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB300890 69836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03 E37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.12 18:29:22 +05'30'

(अनिरुध्द कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अध्यक्ष / सभापती, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
८. मा. विधान सभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई (सर्व).
९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.

१६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३.
१७. सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग).
१८. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१९. उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
२०. उप सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. उप सचिव, (१४७१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. अवर सचिव/कक्ष अधिकारी, लेखाशाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. निवड नस्ती (एसडी-१).